# राजर्षि शाहू महाराजांनी भटक्या विमुक्तांसाठी केलेले लोकोत्तर कार्य

**डॉ. बी. पी. चव्हाण,** इतिहास विभागप्रमुख, न्यू कॉलेज, कोल्हापूर .भ्रमणध्वनी क्र. 9420459560

b-esydrbpchavan66@gmail.com

**गोषवारा–**

राजर्षि शाहू महाराजांनी सामाजिक, आर्थिक, सहकार, कला, क्रीडा, शिक्षण या सर्वच क्षेत्रात भरीव कार्य केलेले असून समाजातील सर्व स्तरांतील लोकांची प्रगती व्हावी हा त्यांचा ध्यास होता. जन्मजात गुन्हेगार ठरविण्यात आलेल्या फासेपारधी, कंजारभाट, कुचकोरवी, माकडवाले, डोंबारी (कोल्हाटी), रामोशी, बेरड या भटक्या विमुक्तांच्या जीवनात स्थिरता यावी, गुन्हेगारी विश्वातून त्यांना बाहेर काढून प्रगतीपथावर आणण्यासाठी राजर्षि शाहू महाराजांनी करवीर राज्यामध्ये लोकोत्तर कार्य केलेले आहे.

गुन्हेगार समजल्या गेलेल्या जातींची हजेरी माफ करणे, निवाऱ्याची व्यवस्था करणे, रोजगार देणे, आरक्षणाचा लाभ देणे इ., समाज सुधारण विषयक कार्याची मांडणी प्रस्तुत शोध–निबंधामध्ये करण्यात आलेली आहे.

**प्रस्तावना–**

गावगाडयाच्या परीघाबाहेर, काही जमाती पिढयानंपिढया, उपजीविकेसाठी भटकत राहिल्या. आपल्या चालीरीती, रुढी, परंपरानुसार त्या स्वतंत्र व तटस्थपणे जगत राहिल्या. त्यांचे उपरेपणाचे दुःख अस्पृश्यतेपेक्षा ही भयानक होते. इंग्रज सरकारने 1871 मध्ये महाराष्ट्रातील तत्कालीन 42 भटक्या जमातीपैकी 14 भटक्या जमातींना जन्मजात गुन्हेगार ठरवून गुन्हेगार जमाती कायदा लागू केला. अशा परिस्थितीमध्ये राजर्षि शाहू महाराजांनी या गुन्हेगार ठरविण्यात आलेल्या जमातींना, माणसांत आणण्याचे अभूतपूर्व कार्य केले. त्यांच्या जीवनात स्थिरता आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या विकासासाठी भरीव व लोकोत्तर कार्य केले.

**उद्दिष्टये–**

1) भटक्या विमुक्तांच्या स्थिरतेसाठी राजर्षि शाहू महाराजांनी केलेले कार्य अभ्यासणे.
2) भटक्या विमुक्तांच्या रोजगारासाठी, उदरनिर्वाहासाठी राजर्षि शाहू महाराजांनी केलेले कार्य अभ्यासणे.
3) जन्मजात गुन्हेगार ठरविण्यात आलेल्या भटक्या–विमुक्तांची हजेरी माफ करण्यासंदर्भात राजर्षि शाहू महाराजांनी केलेले कार्य अभ्यासणे.
4) भटक्या–विमुक्तांसाठी नोकरीत राखीव जागा, आरक्षणा संदर्भात राजर्षि शाहू महाराजांनी केलेले कार्य अभ्यासणे.

**संशोधन पध्दती–**

ऐतिहासिक संशोधन पध्दती

**विग्रह– विश्लेषण–**

करवीर संस्थानामध्ये राजर्षि शाहू महाराजांनी दीन–दलित, उपेक्षित, वंचित, मागास, भटक्या – विमुक्तांसाठी लोकोत्तर कार्य केलेले आहे. लोकराजा शाहू छत्रपतींनी 26 जुलै 1902 रोजी आपल्या संस्थानातील मागासलेल्या जातींच्यासाठी नोकरीत 50 टक्के जागा राखीव देणारा, क्रांतिकारक जाहिरनामा प्रसिध्द केला व तो लागू गेला. "मागासलेल्या वर्गाचा अर्थ ब्राम्हण, परभू, शेणवी, पारशी व दुसरे पुढे गेलेले वर्ण खेरीज सर्व वर्ण असा समजावा. हा हुकूम पोहचल्या तारखेपासून रिकामे झालेल्या जागांपैकी शेकडा पन्नास जागा मागासलेल्या लोकांस भराव्या."[1] या क्रांतिकारक निर्णयाचा लाभ काही प्रमाणात, संस्थानात स्थिर झालेल्या भटक्या–विमुक्तांना मिळाला. भटक्या विमुक्त जाती जमातीतील लोक स्थिर नसल्याने, समाज विखुरलेला असल्याने, संख्येने नगण्य असल्याने, अशिक्षित व अजागृत असल्याने या समाजामध्ये लाभार्थीचे प्रमाण इतर समाजापेक्षा अत्यल्प असल्याचे दिसते.

शाहू राजांचे लोकोत्तर, असामान्य कार्य भटक्या–विमुक्तां संदर्भात पहायला मिळते. "फासेपारधी सारख्या भटक्या आणि गुन्हेगार म्हणून बदनाम झालेल्या जमातीला त्याने आपल्या पोटाशी धरुन, फासेपारध्यांच्या नेमणुका स्वतःच्या खाजगी पहाऱ्यावर, प्रत्यक्ष राजवाडयात करुन त्यांच्यात, आपण ही इतरांच्या सारखी हाडामासांची 'माणसे' आहोत, हा दुर्दम्य आत्मविश्वास निर्माण केला"[2]

शाहू महाराजांनी पारधी, कंजारभाट, कुचकोरवी, माकडवाले, डोंबारी (कोल्हाटी) या भटक्या विमुक्त जमातींच्या स्थिरतेसाठी, विकासासाठी भरीव प्रयत्न केल्याचे दिसून येतात. त्यांनी "आपल्या आभाळाएवढया मायेच्या छत्राखाली या गुन्हेगार जमातींना आश्रय दिला."[3] "पारधी, कंजारभाटांना 600 एकर जागा बक्षिस म्हणून दिली."[4] "वडार समाजाला खाणीसाठी जागा दिली."[5] "कोरव्यांना आपल्या संस्थानात त्यांच्या कुटुंबासह आणले आणि त्यांना शिकारखान्यात नोकरीस ठेवले. गुराप्पा कोरवी या तरुण मुलग्याला पैलवान केले आणि त्यांना राजाश्रय दिला."[6] सर्व फासेपारध्यांना आपल्या कुटुंबासह सोनतळीला हलविले त्यांना घरटी शिधा देण्याची व्यवस्था केली. "समाजाने झिडकारलेल्या अनाथ, दलित अशा फासेपारध्यांचा आस्थेने व कळकळीने विचार व कृती करणारे छ. शाहू महाराज हे एकमेवच होते."[7] स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रज सरकारने 1871 मध्ये तत्कालिन 42 भटक्या जमातीपैकी 14 भटक्या जमातींना जन्मजात गुन्हेगार ठरवून गुन्हेगार जमाती कायदा लागू केलेला असतांना, करवीर राज्यामध्ये त्या समाजावरील जन्मजात गुन्हेगारीचा शिक्का पुसून त्यांना समाजव्यवस्थेच्या परीघामध्ये आणण्याचे महान कार्य केल्याचे दिसते राजर्षि शाहू महाराजांनी भटक्या, विमुक्त जमातीसाठी

लोकोध्दाराचे अनमोल असे कार्य केले आहे. त्या संदर्भातील कागदपत्रे अस्सल स्वरुपात शासनाच्या पुराभिलेखागार कार्यालय, कोल्हापूरमध्ये उपलब्ध आहेत.

**राजर्षि शाहू महाराज यांनी भटक्या विमुक्त जातीसाठी काढलेले जाहिरनामे व हुकूमनामे :**

- वाडी रत्नागिरी येथील चावडी नजीक रामोशाचे अडयाची इमारत दुरुस्त करणेकरीता पत्रा वगैरे घालणेबद्दल 108 रुपये छ. शाहू महाराजांनी दि. 25.06.1908 रोजी मंजूर केले आहेत.[8] – शाहू छत्रपती
- भडगांव महार व बेरड शाळेची मुदत एकवर्ष वाढविण्यास दि. 27.11.1909 च्या आदेशानुसार मंजूरी दिली आहे.[9] – शाहू छत्रपती
- दिवाण कि.आ.225 ता. 03.05.1910 इ. शाहूपुरीत फासेपारधी लोकांस तीन घरे हुजूर आज्ञेवरुन तात्या बाबाजी सावंत याजकडून बांधून देण्यात आली आहेत. त्याचे खणीचे बील 5226966 मंजूर होणेबद्दल (522 रु. 9 आणे 6 पै.)
  निकाल हुकूमः सदरहू रक्कम खा. खातेचे नावे खर्च लिहून अदा करणेचे मंजूर केले आहे.[10] – शाहू छत्रपती
- दिवाण इ.आ. 116/20.07.1910 फासे पारधी लोकांकडे पिकास फावडी वगैरे हत्यारे 180 इमारत खात्याकडील देणेबद्दल व ती पके खाते खर्च घालणे हु. आज्ञा झाले प्रमाणे तजवीज होत आहे. लेखी आज्ञा होणेबद्दल
  निकाल ता. 23.08.1910
  निकाल हुकूम – सदरहू प्रमाणे आज्ञा झाली आहे.
  दाखल ता. 23.07.1910 पोटखाते इमारत.[11] – शाहू छत्रपती
- दि.आ.द.भाग हु. जा. 149/21.09.1912 मौजे केर्ले पेटा करवीर येथे फासेपारधी लोकांस राहण्यास झोपडया बांधून देणे बाा व त्यास काही जमिन लागवड करुन उत्पन्न देणेबाबत हुजूरची समक्ष आज्ञा झाले प्रो लोकांच्या रयताव्याच्या व इनामाच्या जमिनी गेल्या त्याचे मोबदल्याबाा पत्रक करुन पाठविले आहे त्या प्रो मोबदला पुरा करावा.
  निकाल ता. 05.02.1912
  निकाल हुकूम – डि.आ.द.भाग यांनी लिहिले प्रो जमिनी सरकारात घेऊन पत्रकाप्रो मोबदला पूरा करण्याचे मंजूर केले आहे.
  दाखल ता. 25.01.1912 पो.खा.वतनबाब.[12] – शाहू छत्रपती
- दिवाण हु. जा. 47/31.08.1912 कोटीतीर्थाचे माळावर फासेपारधी लोकांना त्यांच्या तेवीस कुटुंबासझोपडया बांधून देणे बाा व या कामाकरीता 1200 रुपये प. वर्क्स खाते खर्च घालून रा. सा. सु.|| म्यु. कमेटी यांजकडे विषई आज्ञा. जाहले वाा रा. सा.|| म्यु. कमेटी यांचे पत्र आले आहे. सदर पत्राप्रमाणे रक्कम 1200 तसलमात खर्च लिहून आदा करणे विषई खजानिस यास हु|| देणेत आला आहे. जाहलेली मंजूरी स्पे. समजून हिशेब आणवून जमा खर्च करणेची तजवीज ठेवीत आहे. त्यास मंजूरी असावी म्हणून.
  निकाल ता. 16.11.1912
  निकाल हुकूम –सदर्हु प्रो आज्ञा झाली होती तजविजेस मंजूरी देणेत येत आहे.
  दाखल ता. 03.09.1912 पो.खा. जनरल.[13] – शाहू छत्रपती
- दिवाण इ. जा. 2509/07.05.1913 सोनतळी येथे गवताचे रखवाली करीता फासेपारधी यास ऊसाचे पाल्याचे छपरे बांधून देणेबद्दलचे खर्चास रुपये 361063 चे स्पे. सांगसन मिळावे म्हणून (3रु.10आणे 3पै.)
  निकाल ता. 31.05.1913
  निकाल हुकूम –रा.ब.दिवाण यांचे अभिप्रायाप्रमाणे (361063) चे स्पे. सांगसन देणेत येत आहे.
  दाखल ता. 12.05.1913 पो.खा. इमारत.[14] – शाहू छत्रपती

**गुन्हेगार समजल्या गेलेल्या चार जातींची हजेरी माफ करणारा शाहू महाराजांचा हुकूम :**

- वट नंबर 5 ता. 27 जुलई 1918 इ.

  इलाखे मजकूरी गुन्हेगार जातींच्या लोकांची हजेरी दररोज पोलीस पाटलाकडे होते त्यातील काही जातींची हजेरी माफ केली असून काही काही ठिकाणी त्यांची हजेरी अद्याप घेण्यात येते, या हजेरीपासून त्या–त्या जातींच्या लोकांची फार गैरसोय होते व इनामाचे धंदे करुन पोट भरण्यास अडचण पडते, ही सर्व अडचण दूर झाली पाहिजे यासाठी हुकूम देण्यात येतो की –

  महार, मांग, रामोशी व बेरड या चार जातींच्या लोकांची हजेरी बंद करण्यात यावी यातील जे कोणी गुन्हयात सापडून शिक्षा झालेले असतील त्यांना मात्र या हुकूमाने हजेरीची माफी नाही या हुकूमाचा अंमल ताबडतोब करण्यात यावा. अशी श्रीमन्महाराज छत्रपती साहेब सरकार करवीर यांचे हुजूरुन आज्ञा झाली आहे. त्याप्रमाणे तजवीज ठेवावी.[15] –डी. डी. सोनटाके

  (करवीर सरकारचे गॅझेट, भाग 1 ता. 03 ऑगस्ट 1918) डि. माजिस्ट्रेट

- रावब सरसुभे इ. करवीर हु. से. आ. 44/05.03.1920 फासेपारधी लोकांना खणदाळ, आळणवाडी, कंकणवाडी महाल, रायबाग येथे जमिनी दिल्या त्यांचे सनदेबद्दलचे कामी इनाम वंशपरंपरेने देण्याचे की कसे ती आज्ञा व्हावी म्हणून.
  निकाल ता. 14.04.1921
  निकाल हुकूम –वंशपरंपरा जात ईनाम करुन देणे.
  दाखल ता. 28.02.1921 पो.खा.मुलकी खाते.[16] – शाहू छत्रपती

**निष्कर्ष–**

1952 मध्ये भारत सरकारने गुन्हेगार जमाती कायदा रद्द केला. मात्र त्याच्या किती तरी पूर्वीच 1918 मध्येच गुन्हेगार समजल्या गेलेल्या जातींची हजेरी माफ करण्याचे व त्यांना माणसांत आणण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले.

1960 साली पंतप्रधान जवाहरलाल नेहरुंनी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत सोलापूर येथील सेटलमेंटच्या तारांची कुंपणे समारंभपूर्वक तोडली पण त्याच्या कितीतरी पूर्वीच 1908 पासूनच या जमातींच्या स्थिरतेसाठी, त्यांच्या रोजगारांसाठी, उदरनिर्वाहासाठी शाहू महाराजांनी भरीव कार्य केले.

1961 पासून महाराष्ट्र शासनाने, भटक्या विमुक्तांच्या विकासासाठी एकत्रित 4 टक्के आरक्षण धोरण लागू केले. पण त्याच्या कितीतरी पूर्वीच 1902 मध्ये मागासलेल्या जातींच्यासाठी नोकरीत 50 टक्के जागा राखीव देणारा, क्रांतिकारक जाहिरनामा लागू केला. काही प्रमाणात स्थिर झालेल्या भटक्या विमुक्तांना ही त्याचा लाभ झाला.एकंदरीत राजर्षि शाहू महाराजांनी भटक्या–विमुक्तांच्यासाठी लोकोत्तर व भरीव स्वरुपाचे कार्य केलेले आहे.

**संदर्भ–**


1. जाधव रमेश, 'लोकराजा शाहू छत्रपती,' पृ. 208.
2. कित्ता, मनोगत, पृ. 25.
3. पवार जयसिंगराव (संपा.), 'राजर्षि शाहू स्मारक ग्रंथ,' लेख क्र.27, पृ.503.
4. कित्ता, पृ.504.
5. कित्ता, पृ.510.
6. भोसले व्यंकाप्पा,'आम्ही उपेक्षित,' पृ.25 ते 27.
7. साळुंखे पी.बी.(संपा.), 'राजर्षि शाहू स्मारक ग्रंथ,' लेख क्र.14, पृ.157, 158.
8. छ. शाहू महाराज ठराव बुक नं.67, पृ.43.
9. छ. शाहू महाराज ठराव बुक नं.71, पृ.145.
10. छ. शाहू महाराज ठराव बुक नं.82, पृ.71.
11. छ. शाहू महाराज ठराव बुक नं.82, पृ.145.
12. छ. शाहू महाराज ठराव बुक नं.88, पृ.425.
13. छ. शाहू महाराज ठराव बुक नं.98, पृ.212.
14. छ. शाहू महाराज ठराव बुक नं.106, पृ.192.
15. पवार जयसिंगराव (संपा.), 'राजर्षि शाहू छत्रपती जाहीरनामे व हुकूमनामे,' पृ. 103.
16. छ. शाहू महाराज